**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ । अंक २६७ । गुरुवार २३ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २   https://epaper.dainkaakarshan.com   E-mail- dainikaakarshan@gmail.com   RNI NO. MAHMAR/2021/84322


### दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर

# नगरमध्ये अण्णा हजारे यांचे मौन धरणे; शांततामय आंदोलनातून लोकशाहीचा संदेश






**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तसेच आंदोलनावर करण्यात आल्याचा आरोप असलेल्या दडपशाहीच्या निषेधार्थ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आज नगर येथील गांधी स्मारक, वाडिया पार्क येथे मौन धरणे आंदोलन केले. वयाच्या नव्वदाव्या वर्षातही देशातील तरुणांच्या प्रश्नांसाठी अण्णा हजारे आंदोलनात सहभागी झाल्याने उपस्थित नागरिकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण होते.

आंदोलनासाठी नगरकडे रवाना होण्यापूर्वी अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धी येथील ग्रामदैवत यादव बाबा मंदिरात जाऊन दर्शन घेतले. त्यानंतर ते आंदोलनस्थळी दाखल झाले.

यावेळी अण्णा हजारे यांनी देशातील तरुणांच्या प्रश्नांबाबत तीव्र चिंता व्यक्त केली. शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की, लोकशाहीमध्ये कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दडपशाहीत नसून संवादात आहे.

आंदोलनादरम्यान अण्णा हजारे भावूक झाल्याचे दिसून आले. शांततामय आणि गांधीवादी मार्गाने आंदोलन करणाऱ्या

■ पान ४ वर

#### लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याची शपथ

या मौन धरणे आंदोलनात नागरिक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सहभागी नागरिकांनी हातावर काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केला आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करण्याची शपथ घेतली. वयाच्या नव्वदाव्या वर्षीही जनहिताच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून मौन धरणे आंदोलन करणाऱ्या अण्णा हजारे यांनी तरुण पिढीला लोकशाही, अहिंसा आणि सत्याग्रहाचा प्रभावी संदेश दिल्याची भावना व्यक्त होत आहे.



दोन दिवसांनी येणाऱ्या आषाढी एकादशीचे औचित्य साधुन भाविकांना श्री विठु माऊलीचे मनोभावे दर्शन व्हावे या उदात्त भावनेने नगर – मनमाड रस्त्यावरील डॉ.विठ्ठलराव विखे फौंडेशनच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर श्री विठुरायाची आकर्षक सजावटीची अशी ३० फुटी मुर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली आहे.
(छाया – अनिल शाह,नगर )

## श्रीरामपुरात कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांची एलसीबीकडून सुटका

### सव्वासात लाखांचा मुद्देमाल जप्त । वाहनचालकासह चौघांवर गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** कत्तलीसाठी निर्दयतेने वाहनात कोंबून नेल्या जाणाऱ्या गोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने श्रीरामपूर शहरात कारवाई करत सुटका केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ६ लाख रुपयांचे पिकअप वाहन आणि १ लाख ३५ हजार रुपये किमतीची जनावरे

## साई भक्तांच्या श्रद्धेचा अवमान?

### शिर्डीत समाधी चौथऱ्यावर अभिनेत्याच्या प्रवेशावरून नव्या वादाची शक्यता; ग्रामस्थ जाब विचारणार!



**दैनिक आकर्षण । प्रशांत अग्रवाल**

**शिर्डी–** ‘‘शिर्डीचे साईबाबा संस्थान प्रशासन पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची चिन्हे दिसत असून शिर्डीत साईबाबांच्या जीवनावर आधारित एका चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे.मात्र या चित्रीकरणादरम्यान साईबाबांची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्याला थेट साईबाबांच्या समाधी चौथऱ्यावर बसवण्यात आल्याचा व्हिडिओ आणि छायाचित्रे समोर आल्यानंतर नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

साईबाबांची समाधी ही देश-विदेशातील कोट्यवधी साईभक्तांची श्रद्धेचे केंद्र आहे. त्यामुळे समाधी चौथऱ्यावर पुजारी सोडून बाकी कोणालाही बसण्याची परवानगी नाहीये.मात्र साईबाबांच्या भूमिकेत असलेला अभिनेता थेट समाधी चौथऱ्यावर बसतांनाचा व्हिडिओ समोर आल्याने शिर्डीतील ग्रामस्थ, साईभक्त आणि विविध साई संघटनांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून उद्या शिर्डी ग्रामस्थ साई संस्थानच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी जाणार असल्याचे समजते.

विशेष म्हणजे हा प्रकार साई संस्थानच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिलीये..या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी साई संस्थानने परवानगी दिली असल्यास कोणत्या अटींवर दिली होती..? समाधीवर अभिनेत्याला बसवण्यास विशेष परवानगी होती का..? तसेच धार्मिक भावना लक्षात घेऊन आवश्यक नियमांचे पालन करण्यात आले होते का..? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. या संपूर्ण प्रकारामुळे साई भक्तांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालीये.उद्या शिर्डी ग्रामस्थ अधिकाऱ्यांना

■ पान ४ वर

## श्री साई समाधी वर जाऊन बसण्याचा प्रकार निषेधार्ह, हा भक्तांच्या भावनेचा अपमान– ना राधाकृष्ण विखे पा.

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**शिर्डी–** काल एका साईबाबांच्या चित्रपटाचे चित्रीकरण मंदिर परिसरात सुरू असताना श्री साईबाबांच्या समाधी चौथऱ्यावर चित्रपटातील अभिनेता थेट जाऊन बसल्याने मोठा वाद निर्माण झाला होता व याबाबत ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला जाब विचारण्यासाठी मंदिर परिसरात पोहोचले याप्रसंगी ना राधाकृष्ण विखे पाटील हे देखील साई मंदिर परिसरात आल्याने ग्रामस्थांनी ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनासोबत बैठक घेत याबाबत विचारणा केली असता याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाईचे आश्वासन दिल्याने सदर वादावर सध्या तरी पडदा पडला आहे यावेळी ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटले की श्री साईबाबांच्या समाधी मंदिरात घडलेला प्रकार गंभीर असून हा प्रकार निषेधार्ह आहे, साईभक्तांच्या भावनेचा अपमान झाला असून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेतली असून संबंधित व्यक्ती समाधी चौथऱ्यावर पोहोचला कसा याची चौकशी

■ पान ४ वर

## लोणी व्यंकनाथ येथे शेततळ्यात बुडून दोन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**





**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील मडकेवाडी परिसरात दोन चिमुकल्या मुलींचा शेततळ्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेमुळे मडकेवाडीसह संपूर्ण लोणी व्यंकनाथ परिसरात शोककळा पसरली आहे.

इरा आनंदी कांडेकर आणि आनंदी अनिल कांडेकर या दोन चिमुकल्या घराजवळील डाळिंबाच्या शेतात गेल्या होत्या. काही वेळ शेतात थांबल्यानंतर त्या जवळच असलेल्या शेततळ्याकडे गेल्या. संबंधित शेततळ्याचे काम नुकतेच पूर्ण झाले होते आणि त्याला संरक्षक कुंपण नसल्याने दोघींचा त्यात पडून मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी दोन्ही मुलींना शेततळ्यातून बाहेर काढून गावातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगून पुढील उपचारासाठी तातडीने दुसऱ्या रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला.

दरम्यान, कांडेकर कुटुंबीय व ग्रामस्थांनी शासकीय ग्रामीण रुग्णालयाकडून रुग्णवाहिकेची मागणी केली. मात्र, रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेमुळे संतप्त झालेल्या तरुणांनी शासकीय ग्रामीण रुग्णालयाला टाळे ठोकून निषेध व्यक्त केला.

#### शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

दोन्ही चिमुकल्या मुलींवर मडकेवाडी परिसरात अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या लेकरांना अखेरचा निरोप देताना पालकांनी फोडलेला आक्रोश उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आणणारा ठरला. अंत्यसंस्कारावेळी ग्रामस्थांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यानंतर परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिस आणि ग्रामस्थ यांच्यात काही काळ शाब्दिक वाद झाला. खबरदारीचा उपाय म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त लोणी व्यंकनाथ येथे तैनात करण्यात आला.

## नीट पेपरफुटी, शिक्षणातील भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ भिंगार शहर बंद

### वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन; विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा निषेध



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भिंगार शहरासह अहिल्यानगर शहरातील विविध भागांत बंद पाळण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांना शांततेच्या मार्गाने दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय अध्यक्ष अँड. प्रकाश बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली व पक्षाच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. नीट परीक्षा पेपरफुटी, शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी दिल्लीतील जंतर-मंतर व संसदेसमोर देशभरातील विद्यार्थी, युवक व पालकांनी शांततापूर्ण आंदोलन केले होते. मात्र या आंदोलनाकडे दुर्लक्ष करून आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीचार्ज करण्यात आल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

या कारवाईत अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा तसेच काही आंदोलकांना अटक करून त्यांच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेली कारवाई निषेधार्ह असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी सरकारने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

■ पान ४ वर

### मुख्यमंत्री फडणवीसांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

## उपमहापौर धनंजय जाधवांच्या रक्तदानाने शिबिराचा शुभारंभ

### ११८ रक्ताच्या बाटल्याचे झाले सकलन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर महानगरच्या वतीने जनकल्याण रक्तपेढी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमाचा शुभारंभ उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांनी स्वतः रक्तदान करून केला. रक्तदान हेच श्रेष्ठ दान असून प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करावे, असा संदेश त्यांनी यावेळी दिला. यावेळी माजी उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहण्यात आली.




यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, आयोजक राहुल जामगावकर, संयोजक मंडल अध्यक्ष मुकुल गंधे, निखील वारे, महेश लोंढे, अजय चितळे, कालिंदी केसकर, दीप्ती गांधी, प्रिया जानवे, सविता मोरे, गीता गिल्डा, ज्योती दांडगे,संजय गायकवाड,भानुदास बेरड,वसंत राठोड, बाबासाहेब सानप,रूदेश अंबाडे,रोहन सानप,वसंत लोढा, अमोल निस्ताने,उदय अनभुले, अनिल सबलोक, अशोक गायकवाड,

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### १ ऑगस्टपासून एनसीएमसी कार्ड सक्तीबाबत प्रवाशांमध्ये संभ्रम; मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ द्या : सिरसुल



अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सार्वजनिक वाहतूक अधिक डिजिटल, पारदर्शक आणि सुलभ करण्याच्या उद्देशाने नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) लागू करण्याचा निर्णय घेतला असून, १ ऑगस्ट २०२६ पासून सवलतीच्या प्रवासासाठी हे कार्ड अनिवार्य करण्याची तयारी सुरू आहे. मात्र राज्यभरात आतापर्यंत केवळ १० ते १५ टक्के सवलतधारकांनाच कार्डांचे वितरण झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे एनसीएमसी कार्ड सक्तीची मुदत मार्च २०२७ पर्यंत वाढवावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, राज्य परिवहन महामंडळाने ६५ ते ७५ वर्षांतील ज्येष्ठ नागरिक, ७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिक, १२ वर्षांवरील सर्व महिला, दिव्यांग, विद्यार्थी, पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक आदी सवलतधारकांसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात अशा लाभार्थ्यांची संख्या सहा कोटींपेक्षा अधिक असून, आतापर्यंत केवळ ४० ते ५० लाख कार्डांचे वितरण झाल्याची माहिती आहे. उर्वरित लाभार्थ्यांना ३१ जुलैपर्यंत कार्ड उपलब्ध करून देणे व्यवहार्य नसल्याने लाखो प्रवाशांमध्ये संभ्रम आणि गोंधळ निर्माण झाला आहे. सिरसुल यांनी सांगितले की, सध्या राज्यातील लाखो वारकरी आषाढी वारीत सहभागी झाले असून, ग्रामीण भागातील अनेक नागरिक नोंदणी प्रक्रियेपासून दूर आहेत. अशा परिस्थितीत कार्ड सक्ती करणे अन्यायकारक ठरेल. त्यामुळे शासनाने अंमलबजावणीची निश्चित तारीख जाहीर करण्यापूर्वी वस्तुस्थितीचा विचार करून निर्णय घ्यावा. याबाबत आपण यापूर्वीही राज्य परिवहन महामंडळाकडे सूचना केल्याचे त्यांनी नमूद केले. एनसीएमसी कार्डासाठी १४९ रुपये शुल्क, त्यानंतर किमान १०० रुपये शिल्लक ठेवण्याची अट तसेच ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज करण्याची सक्ती यामुळे अनेक सवलतधारक नागरिक नाराज असल्याचा दावा त्यांनी केला. ग्रामीण भागात रिचार्ज सुविधा, नोंदणी केंद्रांची कमतरता आणि तांत्रिक अडचणी यामुळे या योजनेबाबत विरोधाची भावना वाढत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अमृत ज्येष्ठ नागरिकांना गुडघेदुखी, मणक्याचे विकार आणि इतर आरोग्य समस्यांमुळे नोंदणी केंद्रावर जाणे कठीण जाते. तसेच ७५ वर्षांवरील अनेक नागरिकांचे बोटांचे ठसे स्पष्ट न उमटल्याने आधार पडताळणीमध्ये अडथळे येत आहेत. त्यामुळे नोंदणी केंद्रांवर डोळ्यांच्या बुबुळाद्वारे ओळख पटविणारी यंत्रणा (आयरिस ऑथेंटिकेशन) उपलब्ध करून द्यावी. अन्यथा ७५ वर्षांवरील नागरिकांना केवळ आधारकार्डावरील वयाची पडताळणी करून जुन्याच पद्धतीने सवलतीचा प्रवास सुरू ठेवण्याची मुभा द्यावी, अशीही मागणी त्यांनी केली. एनसीएमसी म्हणजे

## केडगावमधून श्री गणेश पायी दिंडी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान

**विठ्ठल नामाच्या गजरात वारकऱ्यांचा उत्साह; विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमला**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथून सालाबाद प्रमाणे श्री गणेश पायी दिंडीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते पूजन होवून दिंडी मार्गस्थ झाली. यावेळी विठ्ठलनामाच्या गजराने परिसर दुमदुमून गेला होता. ''ज्ञानोबा–तुकोबा'', ''माऊली... माऊली...'' या जयघोषात टाळ–मृदंगाचा निनाद, वारकऱ्यांचा उत्साह आणि भक्तीचा अविस्मरणीय सोहळा रंगला होता.

दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या पायी दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवक सुजय मोहिते, नंदकुमार बोरुडे, दिंडी चालक ह.भ.प. गणेशानंद महाराज शेंडे, सर्व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिंडीचे आयोजक रामदास महाराज शेंडे म्हणाले की, केडगाव परिसरातील रभाजी नगर येथून ही दिंडी प्रस्थान करते. दिंडी अत्यंत शिस्तबद्ध असून, आचार विचार व उच्चार या आधारावर भाविक भक्त चालत राहतात. वारकरी संप्रदायासाठी आस्था असणारे ठिकाण पंढरपूर याकडे जाण्याची गोडी आणखी वाढण्यासाठी आयोजक नेहमी कटिबद्ध आहे. या दिंडीमध्ये सर्वात जास्त महिलांचा सहभाग असतो. महिलांसाठी सर्व स्वतंत्र व्यवस्था असून, इतर भाविक देखील दिंडीत भक्तीचा आनंद घेत असल्याचे त्यांनी सांगितले.

## बायरकडून भारतात अल्पभूधारक शेतकऱ्यांना अत्याधुनिक कीड व्यवस्थापनाद्वारे मदत करण्यासाठी ट्रान्स सादर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** बायरने ट्रान्स या नावीन्यपूर्ण कीटकनाशकाची बाजारातील प्रवेशाची घोषणा केली. हे कीटकनाशक कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मावा, तुडतुडे आणि पांढरी माशी अशा रस शोषणाऱ्या कीट समूहांचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यास उपयुक्त ठरेल. एकाच उत्पादा मध्ये दोन प्रभावी कार्यपद्धती एकत्र करून ट्रान्स व्यापक नियंत्रण देते, ज्यामुळे पिकांचे आरोग्य सुधारते आणि पिकाची उत्पादकता व शेतकऱ्यांचा नफा वाढतो. हे उत्पादन जुलै २०२६ पासून महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, तामिळनाडू, राजस्थान, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, पंजाब आणि हरियाणा अशा प्रमुख कापूस उत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होईल. भारतातील कापूस लागवडीला एकाच वेळी अनेक रस शोषणाऱ्या किडींना सामोरे जावे लागते.

कीटकामध्ये वाढणारी प्रतिकारशक्ती, अनेक प्रकारच्या कीटकांचा एकाच वेळी प्रादुर्भाव आणि कीट व्यवस्थापनासाठी मर्यादित उपायांमुळे पिकाला सतत वाढत्या दबावाला सामोरे जावे लागत आहे. या आव्हानांमुळे अनेकदा पिकांची वाढ खुंटते, उत्पन्न कमी होते आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो. या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विकसित केलेले ट्रान्स दोन प्रगत रसायनांना एकत्र आणते ज्यांची कार्यपद्धती एकमेकांना पूरक आहे. आधुनिक शेतीसाठी तयार केलेले ट्रान्स हे पिकामध्ये दुहेरी मार्ग प्रणाली आणि पर्णपटल–पार क्रियेने काम करते. ज्यामुळे विद्यमान पाने आणि नवीन येणारी पाने या दोन्हींचे संरक्षण शक्य होते. याचे पर्जन्य–प्रतिरोधक सूत्र, फवारणीनंतर दोन तासांनंतर होणाऱ्या पाऊसमूळे याच्या असरकारकते मध्ये काही बाधा आणत नाही. याच बरोबर एकात्मिक कीड व्यवस्थापन कार्यक्रमांमध्ये ट्रान्स सहजपणे सामावू शकते ज्यामुळे अधिक शाश्वत पीक संरक्षण पद्धती शक्य होते.

प्रभावी कीड नियंत्रणापलीकडे जाऊन 'ट्रान्स' पिकाच्या निरोगी वाढीद्वारे पिकाचे आरोग्य जपण्यास मदत करते. हे कीटकांचे जलद अन्नग्रहण थांबवून, पाने अधिक स्वस्थ करते आणि वारंवार पीक संरक्षणाचा हस्तक्षेप कमी करून गुंतवणुकीवरील परतावा व उत्पादन क्षमताही सुधारते. या उत्पादनाबाबत बोलताना बायरच्या क्रॉप सायन्स विभागाचे, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर (सी.ओ.ओ.) मोहन बाबू म्हणाले, ''बायरमध्ये शेतकऱ्यांच्या बदलत्या आव्हानांना समजून घेऊन नवीन उत्पाद निर्मितीची सुरुवात होते. अनेक कीटकांचा एकत्र प्रादुर्भाव आणि वाढती प्रतिरोधक क्षमता यामुळे रस शोषणाऱ्या कीड समूहांचे व्यवस्थापन करणे अधिकाधिक कठीण झाले आहे. ट्रान्स दोन पूरक कार्यपद्धतींना एकाच नाविन्यपूर्ण उपायात एकत्र आणते. त्यातून प्रभावी आणि शाश्वत कीड व्यवस्थापन मिळते आणि शेतकऱ्यांना पिकाचे आरोग्य, उत्पादकता आणि नफा सुधारण्यास मदत करते.'' ट्रान्स बाजारात उपलब्ध करताना बायर आपले पीक संरक्षण उत्पाद संग्रह अधिक मजबूत करत आहे. कंपनी विज्ञानावर आधारित नवनिर्मिती सादर करत असून त्यातून शेतकऱ्यांना संसाधनांचे जतन करण्यासाठी आणि शाश्वत शेतीला चालना देण्यासाठीच्या आपल्या प्रयत्नांमध्ये पुढचे पाऊल टाकत आहे.ट्रान्स १०० मिली, २२० मिली आणि ५०० मिली पॅकमध्ये उपलब्ध असेल.

## पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांची स्कायब्रिज येथे आशीर्वादपर भेट

**स्कायब्रिज येथे सकारात्मक ऊर्जेची अनुभूती : पूज्य प्रविणऋषीजी महाराज**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आचार्यश्रीजींची भूमी असलेल्या अहिल्या नगरमध्ये धर्माचरण आणि धर्माप्रतीची निष्ठा ओतप्रोत भरलेली आहे. आचार्यश्रींच्या समाधीस्थळापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या स्कायब्रिज गृहप्रकल्पात सर्व रहिवासी अतिशय मनोभावे साधूसंतांची सेवा करतात. याठिकाणी सर्व सण उत्सव एकत्रित साजरे केले जातात. प्रत्येक जण आपुलकीचा नात्याने एकमेकांशी जोडला गेलेला आहे. नगरमध्ये होणाऱ्या समर्पण चातुर्मासात सर्वांना एका धाग्याने जोडण्याचा प्रयत्न आहे. स्कायब्रिज मध्ये आल्यावर सकारात्मक ऊर्जेची अनुभूती येते. या सर्व रहिवाशांनी आपला एकोपा आणि जिव्हाळा असाच कायम राखावा असे मार्गदर्शन उपाध्यायश्री पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांनी केले.

नगरमधील बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पाला पूज्य प्रविणऋषीजी म.सा. यांनी नुकतीच आशीर्वादपर भेट दिली. त्याच्या समवेत पूज्य तीर्थेशऋषीजी म.सा. उपस्थित होते. स्कायब्रिज येथील सर्व परिवारांनी उपाध्यायश्रीजींचे उत्स्फूर्त स्वागत केले.

स्कायब्रिजचे अध्यक्ष अमृतलाल कोठारी म्हणाले की, साधूसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा अशी शिकवण आपल्या संस्कृतीने दिली आहे. उपाध्यायश्रीजींचे मंगल आगमन चैतन्यदायी आहे.





त्यांच्या पदस्पर्शाने आणि आशीर्वादानेच स्कायब्रिज पुनित झाली आहे. त्यांच्या सान्निध्यात होणारा आगामी समर्पण चातुर्मास खऱ्या अर्थाने सर्वांच्या जीवनाला नवी दिशा देणारा ठरेल यात शंका नाही. यावेळी स्कायब्रिज गृहप्रकल्पातील सर्व रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपाध्यायश्रीजींनी याठिकाणी मंगल पाठ दिला.

## दिल्लीतील लाठीचार्जच्या निषेधार्थ अहिल्यानगरात एल्गार; केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** देशातील शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र आणि सकारात्मक बदल घडवून आणणे, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करणे तसेच राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा () संदर्भातील विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर–मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अहिल्यानगरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सर्वसामान्य नागरिकांच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी आंदोलनात सहभागी युवक–युवतींवर केलेल्या कथित लाठीचार्जचा निषेध व्यक्त करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

सामाजिक कार्यकर्ते सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, युवक–युवती, महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान सहभागी नागरिकांच्या हातात तिरंगा ध्वज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शहीद भगतसिंह यांच्या प्रतिमा होत्या. ''मोदी सरकार चले जाव'', ''हमे चाहिए आजादी'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. युवकांनी डफाच्या तालावर गीत सादर करत घोषणाबाजी केली. यावेळी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे फलकही झळकविण्यात आले.

## रामवाडी झोपडपट्टीत एसआयआरचे ८० टक्के काम पूर्ण; नागरिकांच्या सोयीसाठी रात्री व पहाटे घरोघरी भेटी

**रामवाडीतील नागरिकांकडून बीएलओ महेश क्षीरसागर व आसाराम गुंड यांचा सन्मान**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष मतदार यादी सखोल पुनर्निरीक्षण अभियानांतर्गत अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रामवाडी परिसरात तब्बल ८० टक्के पडताळणीचे काम पूर्ण करण्यात यश आले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि विविध अडचणींवर मात करत हे काम यशस्वी करणारे बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांच्या कार्याचा रामवाडीतील नागरिकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.


रामवाडी परिसरात मोठ्या प्रमाणावर कचरा वेचक, असंघटित क्षेत्रातील कामगार, रोजंदारी मजूर, ज्येष्ठ नागरिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबे वास्तव्यास आहेत. येथील बहुतांश नागरिक सकाळी लवकर कामासाठी घराबाहेर पडतात आणि रात्री उशिरा घरी परततात. त्यामुळे विशेष मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेअंतर्गत त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पडताळणी करणे हे मोठे आव्हान ठरत होते.

याशिवाय एसआयआर मोहिमेबाबत विविध अफवा आणि गैरसमज पसरल्याने अनेक नागरिक संभ्रमात होते. काही नागरिकांना पडताळणी प्रक्रियेबाबत चुकीची माहिती मिळाल्यामुळे ते सहकार्य करण्यासही साशंक होते. अशा परिस्थितीत बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांनी संयम, समजूतदारपणा आणि संवेदनशीलतेने प्रत्येक नागरिकाशी प्रत्यक्ष संवाद साधला. त्यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करून योग्य माहिती दिली तसेच मतदानाचा हक्क आणि मतदार यादीतील नावाचे महत्त्व समजावून सांगत नागरिकांचा विश्वास संपादन केला.

केवळ कार्यालयीन वेळेपुरते मर्यादित न राहता नागरिक ज्या वेळेत घरी उपलब्ध असतील त्या वेळेनुसार दोन्ही बीएलओंनी पहाटे तसेच रात्री उशिरापर्यंत घरोघरी भेटी दिल्या. निरक्षर नागरिकांचे अर्ज भरून देणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून देणे, प्रक्रियेची माहिती समजावून सांगणे आणि कोणताही पात्र मतदार वंचित राहू नये यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे रामवाडी परिसरातील सुमारे ८० टक्के एसआयआर पडताळणीचे काम पूर्ण होऊ शकले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते विकास भाऊसाहेब उडानशिवे म्हणाले, ''अहिल्यानगर शहरातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीत एसआयआरचे काम पूर्ण करणे हे मोठे आव्हान होते. नागरिक रोजंदारीच्या कामासाठी बाहेर असल्याने त्यांना भेटणे कठीण होते. त्यातच एसआयआर संदर्भात अनेक अफवा पसरल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत अफवांचे निरसन करून नागरिकांचा विश्वास संपादन करणे हे अत्यंत जिकिरीचे काम होते. मात्र बीएलओ महेश क्षीरसागर आणि आसाराम गुंड यांनी नागरिकांच्या सोयीच्या वेळेनुसार पहाटे आणि रात्री भेटी देत अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि सेवाभावाने काम केले.

### शब्दकोडे क्रमांक : १२



**आडवे शब्द :** १. भारतातील एक राज्य ३. जगात सर्वात लोकसंख्या असलेला देश ५. जगातील सर्वात लांब नदी ८. सूत ९.समूह ११.नंतर १२.वेल १४ गाईच्या दुधापासून बनवतात १५.गडद रंगाचा १६.शेरोशायरी असलेल्या गाण्याचा एक प्रकार १८.तमाश्यात सादर होणारे नाट्य २०.तातडीचा संदेश पूर्वी पोस्टद्वारे यायचा त्यास म्हणतात २४.थेट २६.राजवाडा २७.वयोगटाचे बंधन नसलेला २८.देश चालवणारे शासन २९.तोरा ३० पाण्याने भरलेला माठ ३१.जखमी ३४.स्वतः स उच्चारून वापरलेला एक शब्द ३५.बनाव ३६.वडी ३७.हिंदीत-स्फोटक ४०.कर्म ४१.गाडीचे पाय ४२.गावठी ४५.आमटी ४६.जोम ४८.नबाग-उलट लिहा ४९विष्णू ५२.निकड ५३.कंगण ५४.दक्ष

**उभे शब्द :** १. एक जगप्रसिद्ध सर्च इंजिन २.लफडा ३.भाग देण्याची क्रिया ४.जम ६ हिंदीत-चिंच ७. बंध दृष्टी १३.१७. आमटी वाढण्यासाठी वापरतात १९.भूतकाळ २०.दुधापासून बनवतात ते पाचक पेय २१.जगातील सर्वात मोठे वाळवंट २२.बोली लावून करण्यात येणारी विक्री २३.गाईचे पिल्लू २५.हिंदीत-भीती २६ गणेशोत्सवात सजवलेले थर्माकोलचे मंदिर २९. शहर ३०. माता जखम त्वरित ३३. शिकवण देणारा ३५. मरेपर्यंत ३७. वडील ३८. धोका देणारा ३९. रवा पासून बनवतात तो गोड पदार्थ ४३. रान ४४. स्वर्ग-विरुद्ध ४७.आभाळ ४८. फळाच्या आतील प्रकाश ५०. धान्य मोजण्याचे एक प्रमाण ५१. परमेश्वर

**शब्दकोडे क्रमांक : ११ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| हि | रा | | भि | का | री | | आ | शि | या | | प |
| र | व | का | | ज | | ड | | का | | ता | ट |
| क | ण | | स | वा | ल | | स | र | का | र | |
| णी | | का | ल | | ड | फ | ली | | ठी | | पा |
| | हॉ | | ग | ल | का | | म | न | | न | ट |
| फ | की | र | | स | | बी | | म | न | न | |
| ट | | व | सा | | फी | | क | न | क | | वा |
| क | ट | | ह | सू | | खे | द | | ल | वा | द |
| ळ | | वे | स | | मा | | म | ती | | र | न |
| | पा | ढा | | वा | व | र | | स | र | स | |
| पा | प | | भो | व | ळ | | दा | | म | दा | र |
| क | णी | दा | र | | ता | व | दा | न | | र | |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### निराधार ज्येष्ठांना छत्री वाटप, मिष्टान्न भोजन व रक्तदान शिबिर



अहिल्यानगर - भिंगार येथे राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांना अनोखी आदरांजली वाहण्यात आली. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रोकडेश्वर हनुमान मंदिर परिसरात निराधार ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. त्यानंतर त्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. याचबरोबर आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात युवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. आमदार संग्राम जगताप व राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली भिंगार राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. समाजातील गरजू घटकांप्रती संवेदनशीलता जपत स्व. अजित पवार यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ही जयंती समाजोपयोगी पद्धतीने साजरी करण्यात आली. कार्यक्रमादरम्यान ज्येष्ठ नागरिकांना छत्र्यांचे वाटप करून त्यांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी घेण्याचा संदेश देण्यात आला. तसेच रक्तदान शिबिरात अनेक युवकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी योगदान दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, मीडिया सेलचे शहराध्यक्ष मारुती पवार, राष्ट्रवादी युवक काँग्रेस भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, दीपक लिपाने, संपत बेरड, सिद्धार्थ आढाव, प्रशांत डावरे, सुदाम गांधले, विलास तोडमल, अक्षय नागापुरे, राजू जंगम, दिनेश लंगोटे, सागर चवंडके, प्रमोद जाधव, संतोष हजारे, निखिल शिंदे, दीपक राहींज, मतीन ठाकरे, रासने भैय्या, बेरड काका, चेतन वसगडेकर, राजेश तनपुरे, वसंत राठोड यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवम भंडारी म्हणाले की, स्व. अजित पवार यांनी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत विकासाभिमुख राजकारणाची दिशा दिली. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन राष्ट्रवादी युवक काँग्रेस समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत आहे. जयंती केवळ औपचारिक न साजरी करता गरजू नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे आणि रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यात युवकांना सहभागी करून घेणे, हीच त्यांना खरी आदरांजली आहे. आगामी काळातही युवकांना सोबत घेऊन विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मारुती पवार म्हणाले की, रक्तदान हे सर्वोत्तम दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी सिद्ध केली आहे. स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा उपक्रम समाजात सेवा, सहकार्य आणि मानवतेची भावना अधिक दृढ करणारा ठरला असल्याचे त्यांनी सांगितले.

### शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'पसायदान जनलोक अदालत सूर्यानामा

खासगी जागेवरील झोपडीधारकांना मालकी सनद, तर मूळ जमीनमालकांना टीडीआर देण्याची मागणी

अहिल्यानगर (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील खासगी जागांवर अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या पात्र झोपडीधारकांना त्यांच्या घरांसह जमिनीचे कायदेशीर मालकीहक्क मिळावेत, तसेच मूळ जमीनमालकांना हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआर किंवा न्याय्य मोबदला देऊन दोन्ही घटकांना न्याय मिळावा, या प्रमुख मागणीसाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'पसायदान जनलोक अदालत सूर्यानामा' आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.'मेरे देश में मेरा अपना घर आंदोलन', पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या आंदोलनाच्या माध्यमातून राज्य सरकारने झोपडपट्टी पुनर्वसन आणि मालकीहक्काबाबत व्यापक धोरण जाहीर करावे, अशी मागणी करण्यात येणार आहे.देशातील गरीब, कष्टकरी, भूमिहीन, दलित, भटके-विमुक्त, स्थलांतरित मजूर आणि झोपडपट्टीवासीयांना सुरक्षित व कायदेशीर निवाऱ्याचा अधिकार मिळावा, या उद्देशाने पीपल्स हेल्पलाईनने २०१४ मध्ये सुरू केलेल्या 'मेरे देश में मेरा अपना घर आंदोलनाला' आता अधिक व्यापक स्वरूप देण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या जनआंदोलनात झोपडपट्टीवासीय आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## बोल्हेगाव फाटा स्वामी समर्थ केंद्र येथे रविवारी २५ हजार स्वामी चरित्र पारायण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील बोल्हेगाव फाटा परिसरातील संत तुकाराम नगर येथील स्वामी समर्थ केंद्र (दिंडोरी प्रणित) येथे रविवारी (ता. २६ जुलै) सकाळी ८ ते ११ या वेळेत २५ हजार भाविकांचा सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

केंद्रांचे प्रमुख चंद्रशेखर काका लोळगे यांच्या पुढाकारातून हा अभिनव उपक्रम साकारणार आहे. तब्बल २५ वर्षांपूर्वी हे केंद्र सुरु झाले. प्रारंभी परिसरातील विरळ वस्तीमुळे भाविकांची संख्या मर्यादित होती. पण हळूहळू या केंद्रात भाविकांचा ओघ वाढू लागला. व्यसनाधीनतेच्या आहारी जाण्याच्या तसेच नैराश्येच्या मार्गांवर असलेल्या तरुण पिढीला स्वामींचे विचार भावले. साहजिकच या केंद्रात सेवा देणा-यांची संख्या वाढू लागली. जवळ कमी पैसे असतानाही व्यसनांचा मार्ग न अवलंबविता अनेक तरुणांनी अध्यात्मात झोकून देत उद्योग-व्यवसाय करण्यात व नोकरी मिळविण्यात यश मिळविले.

केंद्रातील बाल संस्कार विभागासह सर्व १८ विभागांच्या माध्यमातून सर्वंकष समाज घडविण्याचे काम खूप चांगल्या पद्धतीने झाले. त्यामुळेच सध्या या केंद्रात मोठ्या प्रमाणात सर्व स्तरातील भाविकांची मोठी वर्दळ असते. आता बोल्हेगाव परिसरातील नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी बोल्हेगाव स्वामी समर्थ सेवा केंद्रात परिसरातील भक्तगणांसह जिल्ह्यातून व परजिल्हयातूनही भाविक मंडळी केंद्रात आवर्जून हजेरी लावत असतात. विशेषत: गुरुवार व रविवार या दिवशीची गर्दी उच्चांकी असते. अनेकांना स्वामींच्या सेवेची अनुभूती मिळाली आहे. भरकटण्याच्या स्थितीतील अनेकांना सन्मार्गाला लावण्याचे काम स्वामींच्या आशीर्वादाने या केंद्राच्या माध्यमातून झाले आहे. या बाबीचे आपणास व केंद्रातील सर्व सेवेकरी यांना मोठे समाधान असल्याचे चंद्रशेखर काका लोळगे यांनी सांगितले. या सर्व पार्शवभूमीवर बोल्हेगाव फाटा येथील स्वामी समर्थ केंद्रात रविवारी ( ता. २६ जुलै) रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत २५ हजार भाविकांचा सामूहिक स्वामी चरित्र पारायण सोहळा आयोजित करण्यात आला असून, त्यात आबाल-वृद्धांसह सर्व वयोगटातील भाविकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन चंद्रशेखर काका लोळगे यांनी केले आहे.

## सहजयोग केल्या शिवाय जीवन सफल होऊ शकत नाही - ए.नारायणाराव

### नेल्लोर आंध्रप्रदेशचे सहजयोगी यांची अहिल्यानगर सहज आश्रमला भेट



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नेल्लोर आंध्रप्रदेशचे सहजयोगी हे प. पु. माताजी श्री निर्मला देवी प्रणित अहिल्यानगर येथील सहजभुवन आश्रम ला भेट दिली या वेळी नेल्लोर येथील सहजयोग जिल्हा प्रमुख ए नारायणाराव, वाय शोभराणी, ए. बी सरोजिनी देवी, एन सुलोचना, एस सुब्बारत्नान्ना, डी शंकरान्ना,व्ही श्रीनिवासलू, व्ही लक्ष्मी, व्ही पुष्पावल्ली, व्ही जस्वंत, पी नेलावेणी यांच्यासह अहिल्यानगर चे मा. जिल्हा प्रमुख श्रीनिवास बोज्जा, मा. नगरसेविका सौ.वीणा बोज्जा, सौ. वासंती वैद्य,सोनाली बोज्जा, राणी बोज्जा व पूर्वजा बोज्जा आदी उपस्थित होते.

या वेळी बोलतांना नेल्लोर आंध्रप्रदेश चे मा. जिल्हा प्रमुख ए नारायणराव म्हणाले सहजयोगाची सुरुवात या अहिल्यानगर जिल्ह्यातून झाली असून आज सम्पूर्ण भारतात व जगातील १६० देशापेक्षा जास्त देशातील लोक सहजयोगाचा अवलंब केला. या जिल्हातील सर्व सहजयोगी भाग्यवान व नशीबवान आहेत. आज प्रत्येक मानवाला आपल्या आयुष्यात सुख शांती आणि समाधान पाहिजे असेल तर सहजयोग ध्यान केल्या शिवाय पर्याय नाही. जगात विश्वशांती फक्त सहजयोगा मुळेच मिळू शकते या साठी सर्व सहजयोग्यांची जास्तीत जास्त लोकांना सहजयोग देऊन त्यांना आत्मसात करणेस लावणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक मानवाने सहजयोग केला तरच त्याचे जीवन सफल होऊ शकते. या वेळी अहिल्यानगर सहजयोग परिवाराच्या वतीने नेल्लोर येथील सर्व सहजयोग्यांचे सन्मान करण्यात आला. या वेळी नेल्लोर च्या सहजयोग्यानी तेलगू भाषेत भजने म्हणून सर्वांना मंत्रमुग्ध केले. व त्यांनी नेल्लोर येथील सहजयोग आश्रम ला भेट देण्यासाठी आपण सर्व यावे अशी विनंती केली. या वेळी सर्व सहजयोगी श्रीनिवास बोज्जा यांच्या निवासस्थानी भेट दिली व शेवटी सर्वांचे आभार मानले.

## ग्रामीण भागातील मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले की ते संधीच सोन करतात - जयंत येलुलकर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ग्रामीण भागातील तरुणाईमध्ये मोठी ऊर्जा दडलेली असते. या तरुणाईला योग्य दिशा, व्यासपीठ मिळाले की त्यांच्यातील गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी त्यांना संधी मिळते. अनेक मुलांमध्ये क्रिकेटचे वेड असते. मग ते शहरातील असो की ग्रामीण भागातील या मुलांना योग्य मार्गदर्शन मिळाले की ते मिळालेल्या संधीच सोनं करतात हे निश्चित. यासाठी त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहणारे कार्यकर्ते असावे लागतात. अहिल्या नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात वासुंदे या छोट्याश्या गावात असेच खूप क्रिकेट रसिक आहेत. या गावातील किरण झावरे हा उच्चशिक्षित तरुण मुंबई येथे आय टी क्षेत्रात मोठ्या पदावर काम करत आहे.

महानगरात नोकरीच्या निमित्ताने गेलेला किरण आपल्या मातीशी नाते कायम ठेऊन आहे. गावातील तरूणांना मार्गदर्शन, वेळ प्रसंगी योग्य ठिकाणी मदत करण्यासाठी तो कायम पुढे असतो. किरणला क्रिकेटचे ही वेड आहे. गावातील मुलांनी खेळावे. त्यांच्यातील गुणवत्तेला पालवी फुटावी या एकाच इच्छेने तो दरवर्षी पंधरा दिवस सुट्टी घेऊन आपल्या वासुंदे गावात क्रिकेटची स्पर्धा आयोजित करीत



असतो. यासाठी त्याला गावातील विविध मान्यवर मनापासून सहकार्य करीत असतात.

ही क्रिकेट स्पर्धा उत्तम व्यवस्थापन करीत किरण आणि गावकरी यशस्वीपणे पार पाडत असतात. आजुबाजूच्या गावातील संघ यामध्ये भाग घेत असतात.खेळाबरोबरच उत्साह व गावच्या एकतेचे सुरेख चित्र या निमित्ताने साकारले जाते. मलाही दोनदा या स्पर्धेचे उद्घाटन करण्याची संधी मिळाली. यातून गावची एकता, आपल्या मातीविषयी, आपल्या लोकांविषयी असलेली जिव्हाळ्याची भावना अन् गावातील तरुण विविध क्षेत्रात मोठा व्हावा, यातून गावचे नाव मोठे व्हावे अशी गावकऱ्यांची असलेली भावना याचा सुरेख अनुभव आला.

गाव, गावाची वेस, ग्रामदैवत, छोटा बाजार, गावातील मंदिर, हॉटेल च्या कट्ट्यावर चहा घेत निवांत गप्पा मारणारे गावकरी, तिथली शेती, काबाड कष्ट करणारे शेतकरी, आपल्या शेतात उगवणारी भाजी आग्रहाने देणारा किरण... खरंच जग कितीही भौतिक जगात पाय ठेऊन द्या, शहरातील जिव्हाळा,प्रेम माया आता पूर्वीसारखी राहिली नाही असं आपण म्हणत जरी असलो तरी गावाने आपलं गावपण कायम जपलं आहे.

मातीचा सुगंध तोच आहे जो आपल्याला कायम भावतो.

माझे स्नेही, नगरमधील सरकारी नोकरीतील निवृत्त अधिकारी व मूळचे वासुंदे येथील असलेले समाजसेवक श्री. भास्करराव चेमटे यांच्यामुळे मला या स्पर्धेला उपस्थित राहण्याचा योग आला. आणि किरण झावरे सारख्या खेळावर,आपल्या गावावर मनापासून प्रेम असलेल्या उत्तम संघटकाशी मैत्रीचं नातं जुळण्याचा योग आला. काही क्षण आपल्या मनात कायमची बिंबली जात असतात. गावाविषयी आपली ओढ अधिक दृढ करत असतात.

## पाथर्डी तालुक्यात मतदार विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम प्रभावीपणे राबवावी

### पाथर्डी तालुका मनसेच्या वतीने प्रांत अधिकारी यांचेकडे मागणी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पाथर्डी–** सध्या राज्यभरात मतदार विशेष सखोल पूणर्निरीक्षण मोहीम सुरू असुन त्याअनुषंगाने प्रांत कार्यालयाचे वतीने पाथर्डी तालुका व शहरात मतदान केंद्र निहाय अधिकारी अर्थात ची नेमणूक केलेली आहे. सदर मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणी व्हावी या करिता प्रशासनाचे वतीने नुकतीच तालुक्यातील सर्व राजकीय पक्षाच्या प्रमुखांची बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीमध्ये मान.प्रांताधिकारी यांनी शासनाने नियुक्त केलेले हे हे प्रत्येक घरी जाऊन प्रत्येक मतदारपर्यंत जाणार असल्याचे निक्षून सांगितले होते परंतु प्रत्यक्षात वस्तुस्थिती अगदी उलट आहे.

प्रशासनाचे माध्यमातून नेमले गेलेले हे पाथर्डी शहरातील त्या त्या भागातील एका मंदिरात किंवा खाजगी कार्यालयात/ घरात बसुन संबंधित प्रभागातील चार दोन लोकांना संबंधित यादीमध्ये नाव असलेल्या नागरिकांनी त्यांना ते बसलेल्या ठिकाणी कागदपत्रे घेऊन भेटण्यासाठी निरोप पाठवणे अथवा त्या भागातील व्हॉट्सअॅप ग्रुप वर मेसेज पाठवत भेटण्यासाठी बोलवत आहेत.या पद्धतीमुळे अनेक पात्र मतदारापर्यंत निरोप न गेल्याने त्यांचे नाव मतदार यादीमधून वगळले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शासनाच्या या अतिशय महत्वाच्या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रांताधिकारी कार्यालय व तहसील प्रशासनाचे माध्यमातून नेमले गेलेल्या यांच्या अनास्थेमुळे गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले असुन सदर मोहीम ही मतदार पुनर्निरीक्षण आहे की पात्र मतदार हटविण्याची मोहीम आहे असा सवाल उभा राहीला आहे.

## गेल्या २० वर्षांपासून बौद्ध संस्कार संघाकडून विद्यार्थ्यांना सातत्याने शैक्षणिक मदतीचा हात

### शिक्षणातूनच विद्यार्थ्यांचे जीवन यशस्वी; बौद्ध संस्कार संघाच्या उपक्रमातून शिक्षणाला नवी प्रेरणा – दिलीप भोळे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बहुजन शिक्षक संघाचे मुलांचे वस्तीगृह ,भीमा गौतमी मुलींचे वस्तीगृह तसेच दादासाहेब रूपवते हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले तसेच १०वी, १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच पार पडला .

प्रमुख उपस्थिती (माजी अधीक्षक अभियंता विद्युत महावितरण कंपनीचे) दिलीप भोळे साहेब या प्रसंगी म्हणाले की दरवर्षी बौद्ध संस्कार संघाच्या उपकमांतून प्रयत्नपूर्वक शैक्षणिक साहित्य मदतीने मुलांच्या शिक्षणाला प्रेरणा मिळूत विद्यार्थी जीवन घडले आहे गेले २० वर्षापासून या उपक्रमाला बौद्ध संस्कार संघांचे सदस्य नियमितपणे तन-मन धनाने मदत करत आहेत हिच मदत घेऊन अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनियर विविध क्षेत्रात नोकरी तसेच उत्तम व्यावसायिक बनले आहेत. पूर्वकालीन वरिष्ठांचे योग्य मार्गदर्शन घेऊनच समकालीन सेवानिवृत्त शासकीय अधिकारी समाजसेवा कार्यरत आहेत आणी पुढच्या तरुण पिढीला मार्गदर्शक ठरत आहे हे मी अहिल्यानगरमध्ये नोकरी करत असताना वीस वर्षापासून अनुभवले आहे.

(वैद्यकीय अधिकारी बेगर्स होम विसापूरचे ) डॉ. सुशील तुरुकमाने यांनी मार्गदर्शनातून विचार व्यक्त केले की मी वैद्यकीय कॉलेज शिक्षण घेत असतांना बुद्धपौर्णिमा पाच दिवस धम्मसंस्कार शिबिरात प्रशिक्षण घेऊन बनलो आहे, तसेच माझे मुले परीवार दरवर्षी धम्मप्रशिक्षण घेत आहेत.

बौद्ध संस्कार संघ उपक्रमात - शैक्षणिक साहित्य गणवेश, स्कूलबॅग, वह्या पुस्तके दरवर्षी दहावीपर्यंत मदत घेऊन केतन भाऊसाहेब देठे यांनी इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले आणी गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर व्यावसायिक बनला , आपलेकडूनही विद्यार्थ्यांना मदत करण्याची भावना निर्माण झाल्याने त्यानेही विद्यार्थ्यांना साहित्य व संस्थेसाठी टेबल फॅन दिला. दिलीप भोळे यांनीही दहा स्कूल बॅग दिल्या,प्राध्यापक दिलीप गायकवाड यांनी तीन डझन रजिस्टर नोटबुक व पेन मदत केली. उद्योजक श्रीरंग शेळके ,उद्योजक नानासाहेब डोईफोडे ,उद्योजक सिद्धार्थ भोसले यांनी दहा स्कूलबॅग व आठ डझन रजिस्टर नोटबुक मदत केली. डॉ. प्रा. किरणकुमार साळवे यांनी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केला.

यावेळी १२वी सायन्स मध्ये अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वप्रथम आलेली ९२ टक्के तानवडे ईशा आदिनाथ हिचा विशेष सत्कार करण्यात आला. देशमुख गायत्री विक्रम , मुळे ज्ञानेश्वरी हेमंतराव, शिंदे समृद्धी संतोष ,कोरडे ज्ञानदेव आर्यन, नरसाळे सपना रावसाहेब. तसेच १०वीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य प्रमोद सूर्यवंशी सर, सामाजिक कार्यकर्ते अजय साळवे साहेब,महेश भोसले साहेब, एडवोकेट बळीराम ऊके, इंजि संजीव घोडके, बि .डी. शिंदे साहेब, प्रदीप साळवे साहेब, शशिकांत घोडके साहेब, एस के गायकवाड सर, सुरेश घायमुक्ते साहेब, प्रतिभाताई देठे, राजेंद्र थोरात साहेब ,डॉ.संजय शिंदे, भाऊसाहेब आव्हाड साहेब यांच्या हस्ते सत्कार व मुलांना साहित्य वाटप करण्यात आले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक परवेक्षक प्रा.जयंत गायकवाड , बौद्धाचार्य भाऊसाहेब देठे यांनी केले, प्रमुख मान्यवरांचा सत्कार प्राचार्य प्रमोद सूर्यवंशी सर यांनी तर उपस्थितांचे आभार संजीवन साळवे यांनी केले .

## 'स्वच्छ वारी... सुंदर वारी'चा संदेश देत हरदिन मॉर्निंग ग्रुपची एकदिवसीय पंढरी वारी

### श्री संत नामदेव पायरी परिसरात राबविले स्वच्छता अभियान; भिंगार ते पंढरपूर भक्ती, सेवा आणि स्वच्छतेचा संदेश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भिंगार येथील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय पंढरी वारी उत्साह, भक्तिभाव आणि समाजप्रबोधनाच्या वातावरणात पार पडली. भक्ती, सेवा, सामाजिक बांधिलकी आणि स्वच्छतेचा संगम या वारीतून सर्व सदस्यांना अनुभवायला मिळाला. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि अभंगांच्या सुरेल स्वरांत पंढरपूरकडे रवाना झालेल्या या दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी ''स्वच्छ वारी... सुंदर वारी'' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.

भिंगार येथील श्री रोकडेश्वर हनुमान मंदिरात महाआरती करून हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सदस्य बसने पंढरपूरकडे रवाना झाले. संपूर्ण प्रवासात विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते. ''ज्ञानोबा-तुकोबा'', ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' या गजरात वारकरी भक्तिभावाने तल्लीन झाले होते.

या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण वारीदरम्यान स्वच्छतेचा संदेश देत ठिकठिकाणी स्वच्छता करण्यात आली. पंढरपूरमध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील श्री संत नामदेव पायरी परिसरात



सदस्यांनी हातात झाडू घेत स्वच्छता अभियान राबविले. परिसरातील प्लास्टिक, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तू गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला.

भाविकांनाही प्लास्टिकमुक्त वारी, स्वच्छ मंदिर परिसर आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. ''देवदर्शनाइतकेच देवस्थान आणि परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक भाविकाची जबाबदारी आहे,'' असा संदेश यावेळी देण्यात आला. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने वर्षभर आरोग्य जनजागृती, पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, रक्तदान, सार्वजनिक स्वच्छता आणि सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जातात. त्याचाच एक भाग म्हणून यंदाही स्वच्छतेचा संदेश देणारी एकदिवसीय पंढरी वारी आयोजित करण्यात आली. समाजात स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच धार्मिक कार्यक्रमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

या भक्तिमय आणि सेवाभावी वारीत ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, जहीर सय्यद, दिलीप ठोकळ, अशोक पराते, ताराचंद ठोकळ, विकास भिंगारदिवे, रामनाथ गर्जे, सतीश सपकाळ, सरदारसिंग परदेशी, अविनाश पोतदार, डॉ. अतुल मडावी, राजेंद्र पांढरे, अशोक लोंढे, अशोक दळवी, नवनाथ वेताळ, जालिंदर अळकुटे, सुहास देवराईकर, मच्छिंद्र बेरड, रमेश साके, किसन गुंजाळ, राजेश तनपुरे, संतोष चोपडा, राजकुमार मोरे, उषाताई ठोकळ, सुरेखा आमले, नीता देवराईकर, उमा सोनसळे, आशाताई गर्जे, अश्विनी थोरात, रजनीताई परदेशी, लक्ष्मीताई गायकवाड, अनिता सोनवणे, योगिताताई, अर्चना खर्से, वर्षा काळे, रजनी परदेशी, निमल भिंगारदिवे, देविदास गंडाळ, विलास शिंदे, शब्बीर शेख, गोकुळ भांगे, दर्श गोंधळे, राजाराम थोरात, दत्तात्रय गोंधळे, हिरेंद्र मिश्रा, अनिल बनसोडे आदी सहभागी झाले होते.

# ग्रामीण भागातील बालकांना आधुनिक व संस्कारक्षम शिक्षण मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क

''शिक्षण म्हणजे केवळ चार भिंतींच्या आत पुस्तकातील पाने वाचणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडणारी ती एक सातत्यपूर्ण जीवनप्रक्रिया आहे. आजचे युग हे वेगाने बदलणारे तंत्रज्ञानाचे युग आहे. अशा काळात ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील मुले तंत्रज्ञान आणि गुणवत्तेच्या बाबतीत कुठेही मागे पडता कामा नयेत, हा माझा पहिल्यापासूनचा ध्यास राहिला आहे. निसर्ग, तंत्रज्ञान आणि संस्कार यांची योग्य सांगड घातली, तर सरकारी शाळांमधूनही जागतिक दर्जाचे नागरिक घडवता येतात, यावर माझा ठाम विश्वास आहे.''

**१. डिजिटल तंत्रज्ञान ही काळाची गरज**
माझ्या मते, बदलत्या काळानुसार आपण शिक्षकांनी स्वतःमध्ये बदल घडवून अद्यावत राहणे अत्यंत गरजेचे आहे. तंत्रज्ञान हे शिक्षकाला कधीही पर्याय ठरू शकत नाही, परंतु तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारा शिक्षक हा पारंपरिक अध्यापनापेक्षा विद्यार्थ्यांपर्यंत अधिक वेगाने पोहोचू शकतो. आधुनिक वर्गखोल्या: आमच्या मांडवे खुर्द शाळेत आम्ही प्रत्येक वर्गात डिजिटल स्क्रीन आणि हेड माईकची सोय केली आहे. अध्यापनातील रंजकता: जेव्हा एखादा कठीण घटक विद्यार्थी प्रत्यक्ष पडद्यावर पाहतात आणि ऐकतात, तेव्हा तो त्यांच्या कायमस्वरूपी लक्षात राहतो. त्यामुळे वर्गखोलीत मुलांचा रस आणि उपस्थिती दोन्ही वाढते.

**२. शाळेचा परिसर हीच पहिली शिक्षिका**
माझे स्पष्ट मत आहे की, शाळेची इमारत आणि परिसर असा असावा जिथे पाऊल ठेवताच विद्यार्थ्यांच्या मनात शिकण्याची उत्सुकता आणि आनंद निर्माण झाला पाहिजे. बोलक्या भिंती: आम्ही वर्गाच्या भिंतींवर पाढे, इंग्रजी व मराठी शब्दार्थ छापले आहेत. मुले वर्गात बसून खेळता-खेळता सहज नवीन गोष्टी शिकतात.





**लेखक / मनोगत:**
**श्री. बाबाजी ढोकळे**
**(मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडवे खुर्द, ता. पारनेर, जि. अहिल्या नगर)**

संस्कार आणि निसर्ग: बाहेरील भिंतींवर थोर समाजसुधारकांची चित्रे रेखाटली आहेत. शाळेतील सावलीची झाडे आणि फुलांचा बगीचा विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांना निसर्गाशी जोडतो. हाच माझ्या दृष्टीने खऱ्या आनंददायी शिक्षणाचा पाया आहे.

३. लोकसहभाग आणि लोकवर्गणीतून समृद्ध शाळा व गावाचा विकास
सरकारी शाळा केवळ शासनाच्या अनुदानावर किंवा निधीवर अवलंबून राहण्यापेक्षा, तिला गावाच्या अस्मितेशी आणि लोकसहभागाशी जोडणे अत्यंत गरजेचे आहे, असा माझा ठाम अनुभव आहे. गावकऱ्यांचा विश्वास संपादन करून आम्ही शाळेत लोकसहभाग वाढवला. लोकवर्गणीतून सुविधांची उभारणी: मांडवे खुर्द ग्रामस्थांच्या पुढाकारातून आणि लोकवर्गणीतून शाळेला अत्यंत आवश्यक असणाऱ्या विविध शालोपयोगी वस्तू, भौतिक सुविधा व अद्यावत तंत्रज्ञानाची साधने उपलब्ध झाली आहेत. शाळेतून गावाचा सर्वांगीण विकास: जेव्हा एखादी शाळा लोकसहभागातून समृद्ध होते, तेव्हा ती गावाच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचे केंद्र बनते. पालकांचा सरकारी शाळेवरील विश्वास वाढल्याने गावातील मुलांचे स्थलांतर थांबले आहे आणि गावामध्ये शैक्षणिक वातावरण निर्माण झाले आहे.

४. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये अथांग क्षमता
माझ्या शाळेतील अनेक मुले आज विविध स्पर्धा परीक्षांमध्ये चमकली आहेत आणि क्रीडा क्षेत्रात जिल्हास्तरापर्यंत पोहचली आहेत, याचा मला मुख्याध्यापक म्हणून अभिमान वाटतो. ग्रामीण भागातील मुलांमध्ये प्रचंड प्रतिभा आणि कष्ट करण्याची तयारी असते. गरज असते ती फक्त आपण शिक्षकांनी त्यांना योग्य संधी, मंच आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची. शिक्षकाने केवळ शिक्षक न राहता मार्गदर्शकाची भूमिका बजावली, तर आमची मुले कोणत्याही आव्हानाला सामोरी जाऊ शकतात.

निष्कर्ष:
शिक्षण व्यवस्थेकडे मी केवळ एक नोकरी किंवा व्यवस्था म्हणून न पाहता, ती राष्ट्र उभारणीची पायाभरणी आहे या भावनेने पाहतो. मी आणि माझे सहकारी जेव्हा शाळेला स्वतःचे कुटुंब मानून काम करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण भारताचा शैक्षणिक विकास साध्य होतो, असा माझा ठाम विश्वास आहे.

# स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेची विशेष स्वच्छता मोहीम

**। विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप । महापौर ज्योतीताई गाडे यांनी हातात खोरे, टिकाव आणि घमेले घेऊन स्वच्छता मोहिमेत घेतला प्रत्यक्ष सहभाग**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त हुतात्मा स्मारक तसेच वीर भगतसिंग उद्यान परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. याचबरोबर महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.

विशेष म्हणजे महापौर ज्योतीताई गाडे यांनी स्वतः हातात खोरे, टिकाव आणि घमेले घेऊन स्वच्छता मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदवत नागरिकांमध्ये स्वच्छतेचा संदेश दिला. त्यांच्या सहभागामुळे या मोहिमेला विशेष उत्साह लाभला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, माजी उपमहापौर गीतांजली काळे, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, नगरसेवक मयूर बांगरे, सुमित लोंढे, जालिंदर कोतकर, महेंद्र कांबळे, यशवंत तोडमल, सचिन गाडे, शुभम पांडुळे, डॉ. गणेश निमसे, प्रदीप पवार तसेच न्यू आर्ट्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत 'स्वच्छ, सुंदर आणि हरित अहिल्यानगर' घडविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. स्वर्गीय अजितदादा पवार हे नेहमीच सुंदर, नियोजनबद्ध आणि विकासाभिमुख शहराची संकल्पना मांडत असत. नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांचा कायम प्रयत्न होता.

त्या पुढे म्हणाल्या की, त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी स्वच्छता मोहिमेसह महापालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षण, स्वच्छता आणि सामाजिक उत्तरदायित्व या तिन्ही गोष्टी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाच्या असून प्रत्येक नागरिकाने अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा.

स्वच्छता मोहिमेदरम्यान हुतात्मा स्मारक आणि वीर भगतसिंग उद्यान परिसराची साफसफाई करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यात आले. सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धन आणि शिक्षणाचा संदेश देणारे हे उपक्रम स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त उत्साहात संपन्न झाले.

# प्रा. शांता गडगे यांना इतिहास विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळी ढोकेश्वर** – टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर महाविद्यालयाचे इतिहास विभागातील प्राध्यापक प्रा. शांता गडगे यांना इतिहास विषयातील ''स्वातंत्र्योत्तर कालखंडातील निवडक मराठी व हिंदी चित्रपटामधून दिसून येणारे महिला सबलीकरण : एक चिकित्सक अभ्यास (१९४७२०१०)'' या संशोधनप्रबंधासाठी विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. हा संशोधनप्रबंध अ.जि.म.वि.प्र.स. अहिल्यानगर संस्थेच्या न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्रात डॉ. मीना साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला.


या संशोधनामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडातील निवडक मराठी व हिंदी चित्रपटांमधून प्रतिबिंबित होणाऱ्या महिला सबलीकरणाच्या विविध पैलूंचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. चित्रपट माध्यमातून स्त्रीची बदलती सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक भूमिका, तसेच स्त्री-सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून सखोल वेध या संशोधनात घेण्यात आला आहे. हे संशोधन इतिहास, चित्रपट अभ्यास आणि स्त्री-अभ्यास या क्षेत्रांतील संशोधकांसाठी महत्त्वपूर्ण संदर्भग्रंथ ठरणार आहे.

प्रा. शांता गडगे यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष श्री.रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील , सहसचिव मुकेशदादा मुळे, खजिनदार ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, ज्येष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. वीरेंद्र धनशेट्टी,सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी महाराष्ट्र बंद; कोपरगावात उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । विशाल लोंढे**

**कोपरगाव–** राज्यभर गाजत असलेल्या पेपरफुटी प्रकरणाचा निषेध तसेच आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिलेल्या *महाराष्ट्र बंद*च्या हाकेला गुरुवारी कोपरगाव शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच शहरातील प्रमुख बाजारपेठा ओस पडल्याचे चित्र पाहायला मिळाले असून व्यापारी, व्यावसायिक आणि विविध घटकांनी स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने बंद ठेवत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. सकाळी १२ वाजेपर्यंत शहरातील बहुतांश दुकाने बंद असल्याने कडकडीत बंदचे वातावरण निर्माण झाले होते. मुख्य बाजारपेठ, व्यावसायिक संकुले तसेच विविध व्यापारी आस्थापनांनी





बंदमध्ये सहभाग घेतल्याने शहरातील दैनंदिन व्यवहारांवरही काही प्रमाणात परिणाम झाला.

पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जची निष्पक्ष चौकशी व्हावी, या प्रमुख मागण्यांसाठी राज्यभर हा बंद पुकारण्यात आला असून कोपरगावातही त्याला चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. दरम्यान, शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने एकत्र जमले असून घोषणाबाजी करत त्यांनी शासनाच्या विरोधात तीव्र निषेध व्यक्त केला.

बंदच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी कोपरगाव शहरात पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त तैनात केला आहे. शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलीस गस्त वाढविण्यात आली असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. सकाळपर्यंत शहरात बंद शांततेत पार पडत असून कोणतीही अप्रिय घटना घडलेली नाही.

# सावेडीत २९ जुलै रोजी 'गुरु पौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन

**सद्गुरु ओशो रजनीश यांच्या विचारांचा होणार जागर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परमपूज्य सद्गुरु ओशो रजनीश यांच्या दिव्य विचारांचा आणि आध्यात्मिक वारशाचा जागर करत सावेडी येथील एकवीरा चौक परिसरातील 'शांतिकुटीर' येथे बुधवार, दिनांक २९ जुलै रोजी भव्य 'गुरु पौर्णिमा महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. योग जागृती केंद्र आणि कॉस्मिक आर्ट अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा सोहळा कृतज्ञता, प्रेम आणि समर्पणाच्या भावनेने साजरा होणार आहे.



हा सोहळा सायंकाळी ६:३० ते रात्री ८:३० या वेळेत संपन्न होईल. या महोत्सवाचे मुख्य सूत्र ' ' (अंतर्दृष्टी व अंतःप्रेरणा) आणि '–' (आत्मज्ञान) हे असून, स्वामी आत्मो कुटीर हे उपस्थितांना विशेष मार्गदर्शन व ध्यानसाधना करवून घेणार आहेत. आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या आणि सत्याचा मार्ग दाखवणाऱ्या सद्गुरु ओशो रजनीश यांच्या प्रकाशाचा उत्सव साजरा करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.
हा सोहळा सर्वांसाठी पूर्णपणे खुला ( ) असून वृद्धेश्वर कॉलनी, संदीपनी अकॅडमीच्या मागे, एकवीरा चौक, सावेडी, अहिल्यानगर येथील 'शांतिकुटीर' येथे पार पडेल. तरी अहिल्यानगरमधील सर्व नागरिकांनी, ओशो प्रेमींनी, साधकांनी आणि अध्यात्मप्रेमींनी या महोत्सवाचा व ध्यानसाधनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वामी आत्मो कुटीर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी स्वामी आत्मो कुटीर ९८८१३०३७७१ व शिवाजी साळवे ९८२२९६४८९५ यांना संपर्क करण्याचे म्हंटले आहे.

(पान १ वरून)

## नगरमध्ये अण्णा हजारे यांचे मौन धरणे; शांततामय आंदोलनातून लोकशाहीचा संदेश

विद्यार्थ्यांबाबत आलेल्या वृत्तांमुळे त्यांना वेदना झाल्याचे त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट जाणवत होते. देशाच्या भविष्यासाठी संघर्ष करणाऱ्या तरुणांचा आवाज ऐकणे ही लोकशाहीची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यान आनंद प्रेम संस्थेच्या अंध आणि दिव्यांग लाभार्थींनी देशभक्तिपर गीत सादर केले. त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थित वातावरण अधिक भावनिक झाले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. संपूर्ण आंदोलन शांततामय आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

## श्रीरामपुरात कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांची एलसीबीकडून सुटका

असा एकूण ७ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, भगवान थोरात, रमिझराजा आतार आणि विशाल तनपुरे यांचे पथक २२ जुलै रोजी श्रीरामपूर शहरातील मिल्लतनगर ते गोंधवणी रस्त्यावर गस्त घालत होते.
गस्तीदरम्यान एका पिकअप वाहनातून गोवंशीय जनावरे दाटीवाटीने भरून कत्तलीसाठी नेली जात असल्याची गुप्त बातमी पथकाला मिळाली.
पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पिकअप गाडी (०५ ०६६१) ताब्यात घेतली. गाडीची पाहणी केली असता त्यात अत्यंत निर्दयतेने कोंबलेली गोवंशीय जनावरे आढळून आली.
याप्रकरणी वाहनचालक आबासाहेब विलास काळे (वय ३५, रा. वडगाव निपाणी, ता. श्रीरामपूर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे चौकशी केली असता, ही जनावरे समीर बिलाल कुरेशी, वसीम अय्युब कुरेशी आणि सादिक फरीद कुरेशी (सर्व रा. कुरेशी मोहल्ला, श्रीरामपूर) यांच्या सांगण्यावरून कत्तलीसाठी नेली जात असल्याचे त्याने सांगितले.
या प्रकरणी पोलीस अंमलदार विशाल तनपुरे यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम आणि प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास बंदी घालण्याबाबतच्या कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## साई भक्तांच्या श्रद्धेचा अवमान?

जाब विचारण्यासाठी जाणार असून याप्रकरणी संस्थानची भूमिका काय असणार आणि या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी या प्रकरणी जबाबदार असलेल्या साई संस्थांच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का..? याकडे साईभक्तांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## श्री साई समाधी वर जाऊन बसण्याचा प्रकार निषेधार्ह, हा भक्तांच्या भावनेचा अपमान– ना राधाकृष्ण विखे पा.

करण्यात येईल तिथे उपस्थित अधिकाऱ्यांना देखील कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येईल व भविष्यकाळात असे प्रकार होणार नाही याची काळजी घेण्याचं आश्वासन प्रशासनाने दिल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रसार माध्यमांना दिली त्याचप्रमाणे अप्पे रिक्षा ,अवैध्य वाहतूक आणि भरधाव वाहनांमधून अंमली पदार्थांची तस्करी होते असल्याबाबत सांगत पोलिसांनी या अवैध्य वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात कठोर कारवाई करावी असे आदेश ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्याने अवैध्य व्यवसाय,गुंडगिरी आणि अवैध्य वाहतूक करणाऱ्यांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत

## नीट पेपरफुटी, शिक्षणातील भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ भिंगार शहर बंद

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष हनिफ शेख, जिल्हाध्यक्ष योगेश साठे, युवा जिल्हाध्यक्ष सोमनाथ भैलुमे, युवा जिल्हा उपाध्यक्ष दीपक ससाणे, प्रवीण ओरे, सुहास धीवर, सुरेश पानपाटील, देविदास भालेराव, सुधीर धामणे, ॲड. योगेश गुंजाळ, कर्जत तालुकाध्यक्ष पोपट शेटे, चंद्रकांत नेटके, अंकुश साळवे, जीवन कांबळे, संकेत शिंदे, प्रतीक ठोकळ, संजय शेलार, राजीव भिंगारदिवे, अमर निरभवने, बाजीराव राजगुरू, संध्या मेढे, अविनाश साठे, आढाव यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपमहापौर धनंजय जाधवांच्या रक्तदानाने शिबिराचा शुभारंभ

व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे, हर्षल बोरा,देवेंद्र दुधाले,सुरेश लालबागे,लक्ष्मीकांत तिवारी,निरज राठोड, प्रशांत बुहाडे, संजीव फळे, गोपाल न्यालपेल्ली, संजीव फळे, नवीनचंद्र बजाज, अभिजीत बोरूडे,संतोष गांधी,संजय ढोणे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनिल मोहिते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा भारतीय जनता पक्ष सातत्याने जपत असून, रक्तदानासारख्या उपक्रमातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने नियमित रक्तदान करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन केले.

आयोजक राहुल जामगावकर म्हणाले की, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा संकल्प आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे वाढदिवस साजरा करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समाजासाठी उपयुक्त कार्य करणे. या रक्तदान शिबिराला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल सर्व रक्तदाते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनकल्याण रक्तपेढीचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.''
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा, समर्पण आणि समाजहिताचा संदेश देणारा हा रक्तदान उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. या रक्तदान शिबिराला भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते व रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात अनेक युवकांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.